E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.675

# AKSHARA

**MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL**
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
February 2024 Special Issue 10 Volume VI

# Recent Trends in Commerce, Management, Economics and Information Technology




: Guest Editor:
Dr. Gauri M. Rane
Principal
Dr. Annasaheb G. D. Bendale Mahila Mahavidyalaya, Jalgaon

: Executive Editor:
Dr. Sheela S. Rajput
Dr. Prashant V. Patil
Mrs. Sayalee K. Patil

: Associate Editor:
Dr. V. J. Patil
Dr. P. N. Tayade

Chief Editor : Dr. Girish S. Koli

Akshara Publication

Scanned with CamScanner

**Akshara Multidisciplinary Research Journal**
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429* / SJIF Impact- 5.67 / February 2024 / Special Issue 10 / Vol. VI


| Sr.No | *Title of the Paper* | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 43 | Exploring the Macroeconomic Nexus: Evaluating the Interrelationship between Growth of GDP, Exports, & Foreign Exchange Reserves in the Indian Economy | **Mr. Kailesh Jaitwar** | **188** |
| 44 | An Analytical Study of Social Media Marketing and its Impact on Consumer Behavior in Jalgaon District | **Utkarsh Sanjay Punyashil** | **194** |
| 45 | Self-Help Groups : - A Tool For Empowering Women and Eradicating Poverty Through Education | **Dr. Prashant V. Patil** | **198** |
| 46 | Role of social media in the Development of Women Entrepreneur with special reference to Jalgaon city | **Mrs. Sayalee Kapil Patil** | **203** |
| 47 | A study on the performance of funds management | **Mrs. Jui G Narkhede** | **209** |
| 48 | Challenges and Opportunity before Maharashtra Sugar Industries Special Reference to North Maharashtra | **Dr.Kalyansingh P. Patil** | **211** |
| 49 | Study of working life of un-organized sectors employees | **Jayant Prabhakar Neve** | **213** |
| 50 | भारतातील पर्यटन उद्योग | **श्री. मंगेश संतोष किनगे** | **216** |
| 51 | भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा अभ्यास | **सविता प्रशांत पाटील** | **220** |
| 52 | भारतीय ज्ञान प्रणाली | **कु. वैष्णवी संतोष वाणी**<br>**डॉ. सचिन भास्कर कुंभार** | **222** |
| | ***Abstract*** | | |
| 53 | Building Resilience: Self-Help Groups Driving Sustainable Development in Jalgaon City | **Ritu Yogesh Salunkhe**<br>**Tejashri Prakash Chaudhari** | **226** |
| 54 | The Service Sector as India's Road to Economic Growth | **Gayatri Ashok Bari**<br>**Harshada Madhukar Patil** | **226** |
| 55 | New Education Policy 2020 & Commerce | **Neha Milind Khare**<br>**Komal Dagadu Patil** | **227** |
| 56 | Green Marketing: An analytical study on consumer Awareness in Jalgaon District | **Rohini Sanjay Patil**<br>**Jyotsna Ashok Baviskar** | **227** |
| 57 | Impact of Technology – Oriented World on Children Development In Jalgaon. District | **Maya Pralhad Mahajan**<br>**Jyotsna Ratan Borse** | **227** |
| 58 | Financial Literacy Among Working Women | **Priyanka Ganesh Saraf**<br>**Sakshi Dinesh Bari** | **228** |
| 59 | A Study on Consumer Satisfaction of using Mobile E – Wallet at Jalgaon City | **Ms. Priyanka A. Chaudhari**<br>**Ms. Aachal Rajendra Joshi**<br>**Ms. Jayashri Ravi Hatagale** | **228** |
| 60 | A Study on Impact of Social Media on Mental Health Issues | **Dhanshri Mahesh Chaudhari**<br>**Neha Bhaskar Bhalerao** | **229** |
| 61 | An Analytical Study of Students Perception Towards E-Learning In Higher Education of Jalgaon District | **Dipali Kailas Marathe**<br>**Jayshri Ajay Bhavsar** | **299** |


Scanned with CamScanner

AMRJ
# Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
*E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / February 2024 / Special Issue 10 / Vol. VI*

**51**

## भारताच्या वाढत्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा अभ्यास

सविता प्रशांत पाटील
सहायक प्राध्यापक
डॉ. अण्णासाहेब जी. डी. बेंडाळे महिला महाविद्यालय, जळगाव

---

**प्रस्तावना:**

भारतात माहिती तंत्रज्ञान संदेशवहन दळणवळण व आर्थिक पायाभूत सुविधा यांचा झालेला विकास आणि विकासाच्या वाटेवर मार्गक्रमण करणारी भारतीय अर्थव्यवस्था आज डिजिटल इंडिया म्हणून ओळखले जाते. भारत आज विशेष रूपाने डिजिटल पेमेंट मध्ये जगभराचे नेतृत्व करत आहेत. नागरिकांचे जीवनमान आणि सरकारी कार्य उपायोजना यांच्यात सुधारणा करण्यासाठी औद्योगिक क्षेत्राच्या विकासात अग्रेसर म्हणून भारताची नवीन ओळख जगभरात होते. भारतात डिजिटल इंडिया मोहीम एक राष्ट्रीय बदल आहे. भारतात डिजिटल क्षेत्राची सुरुवात २०१५ मध्ये सुरू केली गेली, डिजिटल इंडिया ही नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली एक महत्त्वकांक्षी योजना आहे. या योजनेचा उद्देश्य भारतातील सर्व क्षेत्रांच्या विकासात डिजिटल क्षेत्राचा प्रवेश करणे व वाढ करणे. की जेणेकरून भारत आधुनिक आणि विकसित देशांच्या यादीत समाविष्ट होईल, त्याचप्रमाणे डिजिटल प्रणालीचा उपयोग करून शासन नागरिकांना विविध सरकारी योजनांचा प्रत्यक्ष लाभ देण्यासाठी या योजना चा फायदा होईल , आणि ही योजना त्यामध्ये बऱ्यापैकी यशस्वी होत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

१) डिजिटल इंडिया चा उद्दिष्टांचा अभ्यास करणे.

२) डिजिटल इंडिया या योजनेमुळे भारताच्या अर्थव्यवस्थेत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

भारत २०४७ पर्यंत विकसित राष्ट्र बनण्याचे ध्येय घेऊन पुढे जात आहे. डिजिटल अर्थव्यवस्थेचे मजबुतीकरण हे आज कोणत्याही देशासाठी प्राधान्याचा मुद्दा आहे, डिजिटल अर्थव्यवस्था मजबूत करूनच भारत विकसित देश होण्याचे उद्दिष्ट साध्य करू शकेल. डिजिटल इंडिया अंतर्गत जनधन योजना, आधार, डिजिटल रोजगार आणि डिजिटल विद्या यासारख्या सुविधा पुरवल्या जात आहेत, यामुळे खेड्यापाड्यातील आणि शहरातील लोकांना सरकारी सेवा सहज मिळू शकतात, की जे देशांच्या समृद्ध ग्रामीण विकासात महत्त्वपूर्ण ठरत आहेत. डिजिटल इंडियाच्या माध्यमातून भारतात डिजिटल शिक्षणालाही प्रोत्साहन दिले जात आहे की ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये तांत्रिक ज्ञान आणि कौशल्य वाढत आहे.

**कार्यक्रमाचा विस्तार:**

केंद्रीय मंत्रिमंडळाने १६ ऑगस्ट रोजी डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या विस्तारास मान्यता देऊन यासाठी ९०३ कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

**डिजिटल इंडिया ध्येय:**

- फ्युचर स्किल प्राईम प्रोग्राम अंतर्गत ६.२५ लाख आयटी व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञानानुसार प्रशिक्षण देऊन त्यांचे कौशल्य सुधारण्यावर भर दिला जाईल .
- माहिती सुरक्षा आणि शिक्षण जागरूकता टप्पा कार्यक्रमांतर्गत २.६५ लाख लोकांना माहिती सुरक्षा क्षेत्रात प्रशिक्षण दिले जाईल.

नॅशनल नॉलेज नेटवर्कच्या आधुनिकीकरण अंतर्गत १७८७ शैक्षणिक संस्था त्यात जोडल्या जातील.

- डीजे लॉकर अंतर्गत डिजिटल दस्ताऐवज पडताळणीची सुविधा आता सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग तसेच इतर संस्थांनाही उपलब्ध असेल.
- युनिफाईड मोबाईल एप्लीकेशन फॉर न्यू एज गव्हर्नर्स ॲपवर सध्या सतराशे हुन अधिक सेवा पुरवल्या जात आहेत. आता या व्यतिरिक्त ५४० अतिरिक्त सेवा देखील उमंग या मोबाईल ॲप वर दिल्या जाणार आहेत डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या विस्तारा अंतर्गत २१३ शहरांमध्ये १२०० स्टार्टर्स ना आर्थिक साह्य दिले जाईल.
- त्याचबरोबर सायबर जागरूकता अभ्यासक्रम चालवून बारा कोटी महाविद्यालय विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा बद्दल जागरूक केले जाईल . राष्ट्रीय सुपर कंप्यूटर मिशन अंतर्गत सध्या अठरा कंप्युटर कार्यरत असून त्यात आणखी नऊ सुपर कम्प्युटर या मिशनमध्ये जोडले जाणार आहेत.२०२२ पर्यंत ४५०० कोटी रुपये खर्चून सुमारे ७० कम्प्युटर बसवण्याचे प्रस्तावाला मंजुरी

Scanned with CamScanner

Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
E- ISSN 2582-5429 / SJIF Impact- 5.67 / February 2024 / Special Issue 10 / Vol. VI

दिलेली आहे.आर्टिफिशियल इंटेलिजन्स द्वारा बहुभाषिक भाषांतर साधना सर्व बावीस वेळापत्रक आणि आठ भाषांमध्ये सुरू केले जाईल, सध्या दहा भाषांमध्ये उपलब्ध आहे.

मागच्या काही वर्षामध्ये भारत डिजिटल पेमेंट प्रणाली मध्ये तेजीने विकसित होत आहे. स्मार्टफोन वापरणाऱ्यांच्या संख्येत होणारी वाढ यामुळे डिजिटल पेमेंट मध्ये सर्वाधिक वाढ झालेली दिसून येते. उदा. एप्रिल २०१६ मध्ये युपी पी आई हा सर्वात वेगाने जास्त डिजिटल पेमेंट मध्ये विकसित पर्याय बनलेला आहे. योजनेचा खरा उद्देश्य सरकारी विभागाला देशातील जनतेशी जोडणे हा आहे. त्याचबरोबर आणखी एक उद्देश आहे की बिना कागदपत्रांचा वापर करून सरकारी सेवा इलेक्ट्रॉनिक रूपाने जनतेपर्यंत पोहोचविणे. ग्रामीण भाग शहरी भागाशी हायस्पीड इंटरनेटच्या माध्यमातून एकमेकांशी जोडले जावेत की जेणेकरून भारतीय अर्थव्यवस्थेला कॅशलेस कडे वाटचाल करता येईल ,फेसलेस पेपरलेस ,कॅशलेस करणे व आधुनिक अर्थव्यवस्था म्हणून ओळख ही प्रमुख उद्दिष्टे डिजिटल कार्यक्रमात विचारात घेण्यात आलेली आहेत.

डिजिटल देवाण-घेवाणीच्या कार्यात वा व्हावी. यासाठी भारत सरकारकडून प्रत्येक क्षेत्रात डिजिटल सुविधा सरळ वहणीय तीव्र गतीने आणि सुरक्षित व्हावे यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात आले आहेत.

रिझर्व बँकेने अलीकडे प्रसिद्ध केलेल्या एका संशोधन अहवालात भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेच्या विकासाबद्दल काही महत्त्वाचे निरीक्षणे दिसून आलेत २०१४ ते २०१९ या कालावधीत एकूण भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास झाला आहे, त्यापेक्षा अडीच पटविकास देशाच्या डिजिटल अर्थव्यवस्थेचा विकास झाला आहे. २०१४ मध्ये देशाची डिजिटल अर्थव्यवस्था 107 अब्ज अमेरिकन डॉलर इतकी होती ,तीच २०१९ मध्ये वाढवून २२२.५ अब्ज डॉलर वर पोहोचली आहे .२००० मध्ये २०१८ मध्ये झालेल्या नोटबंदी नंतरही डिजिटल अर्थव्यवस्थेला खऱ्या अर्थाने चालना मिळाली याच कालावधीत डिजिटल अर्थव्यवस्था ६.२४ कोटी लोकांना रोजगारात सामावून घेण्यात आले , असे रिझर्व बँकेच्या अहवालात म्हटलेले आहे.

डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे देशाच्या एकूण सखल देशांतर्गत उत्पादनात डिजिटल अर्थव्यवस्थेचा ११ टक्के वाट आहे एकूण जीडीपी मध्ये डिजिटल अर्थव्यवस्थेची योगदान लवकरच 20 टक्क्यांपर्यंत पोहोचेल अशी आशा व्यक्त केली जात आहे .

खऱ्या अर्थाने भारत एक मोठी आर्थिक शक्ती म्हणून उदयास आलेली आहे ,सध्या जगभरात सुरू असलेल्या परिवर्तनाच्या युगात देश खूप प्रगती पथावर आहे ,डिजिटल परिवर्तनाचा भारताचा अर्थव्यवस्थेला निश्चितच मोठा फायदा होत आहे.

देशाचे डिजिटल चलन असलेल्या सेंट्रल बँक डिजिटल करन्सी (सीबीडीसी) अर्थात 'ई-रुपी'ने एका दिवसात दहा लाखांहून अधिक व्यवहार करण्याचा विक्रम नोंदविला आहे. २७ डिसेंबर २०२३ रोजी 'ई-रुपी'ने हा विक्रम केल्याचे भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी सांगितले.

भारताने दाखल केलेली यूपीआय प्रणाली आता आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त सुविधा ठरली आहे, तर 'ई-रुपी'नेही त्याच्या पावलावर पाऊल ठेवत विक्रमी कामगिरी केली आहे. रिझर्व्ह बँकेने एक डिसेंबर २०२२ रोजी 'ई-रुपी' हे देशाचे पहिले डिजिटल चलन दाखल केले.

रिझर्व्ह बँकेने २०२३च्या अखेरीस दहा लाख डिजिटल चलन व्यवहारांचा विक्रम गाठण्याचे उद्दिष्ट ठेवले असल्याचे रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर टी. रवी शंकर यांनी जुलै २०२३ मध्ये सांगितले होते.'ई-रुपी' व्यवहारासाठी बँक खात्याची आवश्यकता नसते.

**सारांश :** आजचे युग पूर्णपणे डिजिटल झाले आहे काही दशकांत पूर्वी कार उत्पादनांमध्ये आलेला ऑटोमेशन आता घरापर्यंत पोहोचले ,स्मार्ट लाईफ ,स्मार्ट लॉक, स्मार्ट टीव्ही इत्यादींपासून ते स्मार्ट होईपर्यंतचा हा प्रवास सुरूच आहे. प्रत्येक वस्तू उपकरण हे स्मार्ट असण गरज होत चालली .एकापाठोपाठ एक व्यवस्था स्वयंचलित होत आहेत. आणि आज घडीला त्रुटी असल्या तरी आर्टिफिशियल इंटेलिजन्स च्या क्षेत्रात ज्या वेगाने प्रगती होत आहे होत आहे ,त्यामुळे नक्कीच भारतीय अर्थव्यवस्था डिजिटल अर्थव्यवस्थेच्या बलावरती विकसित देशांच्या यादीत समाविष्ट होईल.

**निष्कर्ष –** भारतामध्ये भविष्यातील डिजिटल तंत्रज्ञानाचा विस्तार होत असताना स्पेस मॅपिंग आणि ॲनिमेशन यामध्ये मोठी भूमिका बजावणार आहे. केंद्र सरकार या क्षेत्रांमध्ये सतत नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देत आहेत यासाठी धोरणात्मक मदती बरोबरच आर्थिक मदतही दिली जात आहे इन स्पेस आणि नवीन ड्रोन धोरण यासारख्या पायऱ्या दहा वर्षात भारताच्या तंत्रज्ञान क्षमतेला नवीन ऊर्जा प्रदान करण्याची मोठी क्षमता आहे.

**संदर्भ सूची :**

https://mahamoney.com/digital-economy-growth-in-india

www.mygov.in

www.leverageedu.com



Scanned with CamScanner